| MHKO050051522024 | दाखल दिनांक | :- | ०३/०९/२०२४. | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | :- | २१/०९/२०२४. | | |
| | निकाल दिनांक | :- | ०२/०७/२०२६. | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | :- | ०१ | ०९ | २९ |

**इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी आर. डी. खराटे)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२८७४/२०२४.**
**निशाणी क्र.१६/ब.**

महाराष्ट्र सरकारतर्फे, }
शहापूर पोलिस ठाणे, कोल्हापूर, } **अभियोग पक्ष.**
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर }

**विरुध्द**

चंद्रशेखर नारायण कांबळे, }
व.व.४४, व्यवसाय – खाजगी नोकरी, } **आरोपी.**
रा.भोईनगर, शहापूर, }
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. }

---

अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ : श्रीमती एम.पी.शेटे.
आरोपीतर्फे विधिज्ञ : श्री.व्ही.बी. भंगाडे.

---

**न्या य नि र्ण य**

(दि.०२ जुलै २०२६ रोजी अधिघोषित.)

आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये खटला चालविण्यात आला आहे.

**अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

**२.** दि.१६/०२/२०२३ रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास खोतवाडी गांवातील नटराज नाष्टा सेंटर जवळील कोंडिग्रे फाटा ते इचलकरंजी रस्त्यावर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपीने त्याचे ताब्यातील हिरोहोंडा पॅशन मोटारसायकल नोंदणीकृत क्र.एमएच-०९-एजे-९४०२ हे वाहन हयगयीने, निष्काळजीपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे

दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवून रस्त्याच्या कडेला थांबलेल्या फिर्यादी विलास दत्तू कदम यांना जोराची धडक देऊन त्यांना गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला अशा स्वरुपाची फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन शहापूर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे गु.र.नं.४२/२०२३ भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये नोंदविला. गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ.श्री.वाय.डी.चळचूक यांनी केला. त्यांनी तपास पुर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

४. दि.१७/१०/२०२५ रोजी आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये आरोपीचे निवेदन **नि.क्र.७** नोंदविले. त्यातील मजकूर आरोपीस त्याचे भाषेत वाचून व समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व खटला चालवण्याची मागणी केली. मुळ फिर्यादी व आरोपी यांनी **नि.क्र.११** वर प्रकरण तडजोड करण्यासाठी अर्ज व फिर्यादी यांनी **नि.क्र.१४ व १५** वर पुरावा बंद व सदरची केस फिर्यादीस चालवायची नसल्याबाबत पुरसिस दाखल करुन प्रकरण तडजोड करण्यासाठी परवानगी मागितली. परंतु, प्रकरणातील भा.दं.वि.सं.कलम २७९ हा गुन्हा तडजोडपात्र नसल्यामुळे परवानगी नाकारण्यात आली.

५. आरोपी विरुध्द सकृतदर्शनी सबळ पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला नाही.

६. अभियोगपक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.पी.शेटे आणि आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.बी.भंगाडे यांचा युक्तिवाद ऐकला.

७. खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले, कारणांसह त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, दि.१६/०२/२०२३ रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास खोतवाडी गांवातील नटराज नाष्टा सेंटर जवळील कोंडिग्रे फाटा ते इचलकरंजी रस्त्यावर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपीने त्याचे ताब्यातील हिरोहोंडा पॅशन मोटारसायकल नोंदणीकृत | **नकारार्थी.** |

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| | क्र.एमएच-०९-एजे-९४०२ हे वाहन मानवी जिवीतास धोका निर्माण होईल किंवा इतरांच्या सुरक्षेला धोका होईल अशाप्रकारे हलगर्जीपणे अथवा निष्काळजीपणे चालविले ? | |
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन मानवी जीवीतास धोका निर्माण होईल किंवा इतरांच्या सुरक्षेला धोका होईल अशाप्रकारे हलगर्जीपणे व निष्काळजीपणे चालवून त्यांनी फिर्यादी विलास दत्तू कदम यांना जखमी केले ? | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन मानवी जीवीतास धोका निर्माण होईल किंवा इतरांच्या सुरक्षेला धोका होईल अशाप्रकारे हलगर्जीपणे व निष्काळजीपणे चालवून त्यांनी फिर्यादी विलास दत्तू कदम यांना गंभीर जखमी केले ? | **नकारार्थी.** |
| ४. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमूद वाहन सार्वजनिक रस्त्यावर इतरांची सुरक्षितता धोक्यात येणा-या वेगात, निष्काळजीपणाने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविले ? | **नकारार्थी.** |
| ५. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

८. अभियोगपक्षाने आरोपी विरूध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी विलास दत्तू कदम (सा.क्र.१) यांना (नि.क्र.१२) वर तपासले.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करिता</u> :-**

९. सदर प्रकरण हे जखमी साक्षिदाराच्या पुराव्यावर अवलंबून असून अभियोगपक्षाची मदार प्रामुख्याने (सा.क्र.१) फिर्यादी विलास दत्तू कदम यांच्या पुराव्यावर

आहे. सदर साक्षिदाराची साक्ष नोंदविण्यात आली असता त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.१६/०२/२०२३ रोजी काय घटना घडली हे त्यांना आठवत नाही परंतु ते खोतवाडी बसस्टॉप जवळ चक्कर येऊन पडले होते. असे काही झाले नाही की, त्या दिवशी त्यांना दुचाकीने धडक दिली व ते जखमी झाले. ते आरोपीला ओळखत नाहीत. त्यांना फिर्यादीतील मजकूर माहिती नाही. सदर साक्षिदाराने अभियोगपक्षास मदत न केल्यामुळे विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादीस उत्तर सुचक प्रश्न विचारले परंतु त्यांनी स्पष्टपणे नकारात्मक स्वरुपाची उत्तरे दिली. त्यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले आहे की, त्यांची व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे.

**१०.** दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील सर्वात महत्वाचा साक्षिदार म्हणजेच फिर्यादीने अभियोगपक्षाच्या कथनांना दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे फिर्याद सिध्द होऊ शकली नसल्याने अभियोगपक्षाच्या मुळ गाभ्याचा घात झाला आहे. तसेच फिर्यादीने आरोपी व फिर्यादी मध्ये तडजोड झाल्याबाबत कथन करुन तसे तडजोड पत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे फिर्यादीने दाखल केलेल्या फिर्यादीचे अवलोकन करता दि.१६/०२/२०२३ रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास खोतवाडी गांवातील नटराज नाष्टा सेंटर जवळील कोंडिग्रे फाटा ते इचलकरंजी रस्त्यावर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपीने त्याचे ताब्यातील हिरोहोंडा पॅशन मोटारसायकल नोंदणीकृत क्र.एमएच-०९-एजे-९४०२ हे वाहन इतरांची सुरक्षितता धोक्यात येणा-या वेगात, निष्काळजीपणाने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवून फिर्यादी विलास दत्तू कदम यांना किरकोळ व गंभीर जखमी केले या बाबी निःसंशय सिध्द होऊ शकल्या नाहीत. याव्यतिरिक्त येथे नमूद करणे गरजेचे आहे की, मुळ फिर्यादी व आरोपी यांनी **नि.क्र.११** वर प्रकरण तडजोड करण्यासाठी अर्ज व फिर्यादी यांनी **नि.क्र.१४ व १५** वर पुरावा बंद व सदरची केस फिर्यादीस चालवायची नसल्याबाबत पुरसिस दाखल करुन फिर्यादी यांनी सदरची केस फिर्यादीस चालवायची नसल्याबाबत कथन केले आहे. त्यामुळे आरोपींवरील आरोप संशयापलीकडे जाऊन सिध्द होऊ शकलेले नाहीत. सदर खटला जरी **फौ.प्र.सं.चे कलम ३२०** प्रमाणे तडजोडीस पात्र नसला तरी एकदंरीत खटल्याचे स्वरुप व उभय पक्षांमधील संबंध पाहता सामाजिक ऐक्य राहण्याचे दृष्टीने अभियोगपक्षाने इतर कोणत्याही साक्षिदारांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे एकंदरीत साक्षीपुराव्याचा विचार करताना आरोपी विरुध्द दोष ठेवण्याइतपत पुरावा दिसून येत नाही. त्यामुळे **मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष मी नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ बाबत</u> -**

**११.** वरील सर्व विवेचनांवरुन मी या निष्कर्षावर आले आहे की, अभियोगपक्ष आरोपींचा गुन्हा नि:संशय सिध्द करण्यास असमर्थ ठरले आहे. सबब, आरोपी हे संशयाचा लाभ मिळण्यास पात्र आहेत. त्याकरीता आरोपी यांना भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्त करणे न्यायोचीत होईल. सबब, मी मुद्दा क्र.५ चे निष्कषार्थ पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| **१.** | **आरोपी चंद्रशेखर नारायण कांबळे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपांतून निर्दोषमुक्त करण्यात येते. |
| **२.** | आरोपीने दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र हे रद्द करण्यात येत आहे. |
| **३.** | जप्त मुद्देमाल काही नाही. त्याबाबत कोणताही आदेश नाही. |
| **४.** | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेकरीता रक्कम रूपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र लिहून द्यावे. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला) | |

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2026.07.02 16:02:09 +0530

(आर. डी. खराटे)

दि.०२/०७/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इचलकरंजी.